दैनिक
www.lokaarambh.com
# लोक आरंभ
संपादक: राहुल मारोतीराव वाईकर
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com

बीड | वर्ष - ०४ थे | अंक ११० | शुक्रवार १० एप्रिल २०२६ | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | पान ४ | किंमत २ रू

Beed | year - ०4 th | Issue110 | Thursday 10 April 2026 | RNI/MAHMAR/2022/84215 Postal No LSB/Beed/RNP-270/2026-2028 | Page 4 | Price 2

# मोठं संकट! पॅसिफिक महासागरात मैला
# चक्रीवादळाचा कहरः भारतालाही फटका बसणार?

भारताच्या सागरी किनाऱ्यांना या वादळाचा फारसा धोका नाही. असं असलं तरी हवामान पूर्णपणे शांतही नाही, कारण इतर स्थानिक प्रणाली सक्रिय आहेत. 9 एप्रिल रोजी आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये हवामान बदलण्याची शक्यता आहे. या भागात मेघगर्जनेसह आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात 30 ते 50 किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे. या काळात उष्णतेची लाटही येण्याची शक्यता आहे. हैदराबादसह अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान 41 ते 44 अंश सेल्सियसपर्यंत जाऊ शकते. त्यामुळे या भागातील लोकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


जगावर मैला चक्रीवादळाचे संकट घोंघावत आहे, यामुळे अनेक देशांची चिंता वाढली आहे. पॅसिफिक महासागरात तयार झालेल्या या चक्रीवादळामुळे 195 किलोमीटर प्रति तास वेगाने वारे वाहू लागले आहेत. हे वादळ एखाद्या देशाच्या किनाऱ्याला धडकल्यास मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आता या चक्रीवादळाचा भारतावर परिणाम होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर बोलताना भारतीय हवामान विभागाने सविस्तर माहिती दिली आहे. भारताला किती धोका? भारतीय हवामान विभागाने मैला चक्रीवादळाबाबत बोलताना स्पष्ट केले आहे की हे चक्रीवादळ भारतापासून खूप दूर आहे. असं असलं तरीही देशातील काही भागांमध्ये वातावरणात बदल जाणवत आहे. दक्षिण भारतात वादळी वाऱ्यांसह पाऊस आणि



विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे, तसेच काही भागात उष्णतेची लाटही येण्याची शक्यता आहे. याचाच अर्थ भारताला थेट चक्रीवादळाचा धोका नसला तरी हवामान अस्थिर होण्याची शक्यता आहे. मैला चक्रीवादळाचा भारताच्या हवामानावर काय परिणाम होणार? मैला हे घातक चक्रीवादळ सध्या पॅसिफिक महासागरातील सोलोमन समुद्राच्या भागात सक्रिय आहे. ऑस्ट्रेलिया आणि पापुआ न्यू गिनी यांच्या दरम्यान तयार झालेले चक्रीवादळ घातक ठरण्याची शक्यता आहे. याला श्रेणी 3 किंवा 4 चे चक्रीवादळ मानले जात आहे. या वादळाच्या आसपास वाऱ्याचा वेग सुमारे 195 किमी प्रति तासपर्यंत पोहोचत आहे. मात्र हे भारतापासून हजारो किलोमीटर दूर असल्याने भारतीय किनाऱ्यांवर याचा थेट परिणाम होण्याची शक्यता नाही. काही राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता
IMD ने दिलेल्या ताज्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात आणि अरबी समुद्रात पुढील काही दिवसांत कोणतेही चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता नाही.

# भिमज्योती जन्मोत्सवाची गेवराईत जल्लोषात सुरूवात
## सामाजिक कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा - समितीचे अवाहन

गेवराई / प्रतिनिधी
गेवराई दि ९ प्रति वर्षा प्रमाणे याही वर्षी गेवराईत भिमज्योती जन्मोत्सव मोठ्या आंनदात साजरा केला जात आहे याही वर्षी विविध सामाजिक उपक्रमाणे हा उत्सव दि ७ एप्रिल पासून गेवराईत साजरा करण्यास सुरूवात झाली आहे तसेच धम्मदेसना ही पु भंदत बूद्धरत्न ( नंदूरबार ) यांचे हस्ते पार पडली तसेच सायं सुप्रसिद्ध गायक अजय देहाडे यांचा भिमगिताचा कार्यक्रम पार पडला तसेच दि ८ रोजी प्रा श्याम मुंडे यांचे महात्मा जोतिराव फूले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा मानव मुक्तीचा विचार यासह ईत्यादी कार्यक्रम पार पडले आहेत.
भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात जगात साजरी केली जाते तसेच यावेळी गेवराई येथील भिमजोती जन्मोस्तव २०२६ हा गेवराई विधान सभा मतदार संघाचे आ विजयसिंह पंडित हे या सार्वजानिक जंयती उत्सव समितीचे अध्यक्ष आहेत तसेच आज दि १० एप्रिल रोजी रक्तदान शिबिर व साय विधिज्ञ महेश मुठाळ यांचे डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेताना,हे सामाजिक कार्यक्रम पार पडले असून यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विधिज्ञ भगवान घूबांर्डे,माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे,विधिज्ञ अभिजीत जैस्वाल,पत्रकार संघाचे अध्यक्ष मधूकर तौर,वैद्यकीय अधीक्षक सुरज कोठावळे,नगर सेवक शारूख पठाण,विजय सुतार,योगेश मोटे,रणविर पंडित,हे उपस्थित होते.




तसेच दि १० एप्रिल रोजी व्याखाते प्रा यशवंत गोसावी यांचे फूले शाहू आंबेडकर भारताचा श्वास आहेत हे व्याख्यान व दि ११ एप्रिल रोजी महात्मा जोतिराव फूले यांच्या जंयतीनिमित्त अभिवादन सभा व साय ७ वा रायझिंग स्ट्रार डान्स एकॅडमी पुणे प्रस्तूत भिमजल्लोष भीम गितांचा कार्यक्रम निर्मार्ते अनिकेत अविनाश गायकवाड,तसेच १२ एप्रिल रोजी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक व संगितकार,राहूल साठे यांचा भीमगितांचा कार्यक्रम शास्त्री चौक याठिकाणी होणार आहे या सर्व कार्यक्रमाला बाळासाहेब सानप,सोपान मडके,जग्गनाथ काळे,डॉ विठ्ठल काळे,सय्यद बद्दोदीन ,मा दादासाहेब घोडके,धनंजय बेदरे,मुकेश महाजन,तसेच १२ एप्रिल रोजी भीमज्योती जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष आ विजयसिंह पंडित,कल्याणराव आखाडे,बीड नगरध्यक्षा प्रेमलताताई पारवे व उप विभागिय पोलिस अधिकारी अनिल कटके यांच्या उपस्थितीथ पार पडणार आहे तरी या भीमज्योती जन्मोत्सव कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे अवाहन भीमज्योती जन्मोत्सव समितीचे रविंद्र बोराडे,नगर सेवक खाजा मामू,गजानन काळे,मायकल सुतार,सय्यद ऐजाज,बप्पा बेदरे,नगर सेवक शेख शहेदाद,रंजित घूबांर्डे,शेख निजामभाई,देवा जोशी,बाबा पिसाळ,दादासाहेब चौधरी,रिपाइं तालुका अध्यक्ष किशोर कांडेकर,बंन्टी सौंदरमल,धम्मपाल भोले,धम्मपाल सौंदरमल आदिंनी केले आहे.

# सुधाकर देशमुख यांची जिल्हाध्यक्षपदी निवड



जिल्हा प्रतिनिधी : बालाजी सिरसाट
नांदेड : मराठा सेवा संघ प्रणित पद्मश्री डॉ.विखे पाटील कृषी परिषदेच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी सुधाकर देशमुख यांची नियुक्तीपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते निवड करण्यात आली. यावेळी मराठा सेवा संघाचे कामाजी पवार,अर्जुन तनपुरे,पंजाब चव्हाण,शेरा पाटील व्ही.टी.शिंदे शिवाजी पाटील,पंडित कदम,सतिश जाधव, राम डाकोरे उपस्थित होते.

# शिवसैनिकांच्या बळावर केजमध्ये भगवा अधिक मजबुत करू : मनोज शिंदे
## केज तालुक्यात एकाच दिवशी शिवसेनेच्या सात शाखा स्थापन

बीड (प्रतिनिधी) शिवसेना वाढवण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या भागात सक्रिय राहून जनतेशी संपर्क वाढवावा. कार्यकर्त्यांनी संघटनेशी निष्ठा ठेवून काम करणे गरजेचे आहे. आगामी काळात शिवसैनिकांच्या बळावर केजमध्ये भगवा अधिक मजबुत करू असा ठाम विश्वास शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांनी व्यक्त केला.
केज तालुक्यातील कासारी, धार्मळा, साबला, लहुरी, येवता, बेंगळवाडी, कोरडेवाडी अशा सात ठिकाणी शिवसेनेच्या शाखांचे उद्घाटन जिल्हा संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपनेत्या संगीताताई ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. यावेळी मनोज शिंदे म्हणाले की, केज तालुक्यातील प्रत्येक गावात, प्रत्येक वाड्या-वस्तीत शिवसेनेचा भगवा पोहोचला पाहिजे हा आमचा निर्धार आहे. नव्याने सुरू झालेल्या या शाखा केवळ नावापुरत्या नसून त्या जनतेच्या प्रश्नांवर लढा देणाऱ्या केंद्रबिंदू ठरतील. आगामी काळात बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, पाणीटंचाई



यांसारख्या मुद्द्यांवर शिवसेना आक्रमक भूमिका घेणार असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. यावेळी उपनेत्या संगीताताई ठोंबरे यांनीही महिलांनी मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी कार्यक्रमास विजयप्रकाश ठोंबरे, पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख केज, दादासाहेब ससाने विधानसभा प्रमुख



केज, दत्तकुमार काकडे युवासेना तालुकाप्रमुख केज, चंद्रशेखर बाप्पा मुकदम ज्येष्ठ नेते, अभिमान बापू पटाईत ज्येष्ठ नेते, आदित्य रांजणकर शेतकरी सेना जिल्हा कार्याध्यक्ष बीड,जयाताई राऊत तालुकाप्रमुख महिला आघाडी, वैशालीताई सांगळे शहर प्रमुख महिला आघाडी, आम्रपाली गजेशिव, विकास काशीद शिवसेना तालुका सचिव, महेंद्र चाटे उपतालुकाप्रमुख, योगेश देशमुख उपतालुकाप्रमुख कैलास उगलमुगले उप तालुकाप्रमुख, सुग्रीव बसवर उपतालुकाप्रमुख, ज्ञानेश्वर भांगे युवासेना उपतालुकाप्रमुख, शिवाजी गायकवाड युवासेना व उपतालुका प्रमुख, किशोर थोरात माजी सरपंच कुंभेफळ, अशोक सक्राते, सुनील पटाईत, शुभम आप्पा गंभीरे ,श्रीराम कदम, शिवशंकर पाटील साबला ,अमोल वळसे पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड, विश्वास जाधव, राजेभाऊ जाधव, पृथ्वीराज इंगळे, दिलावर सिंग गोके, किसन दादा कदम यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
-------
संघटना मजबुत असेल तर विजय आपलाच : मुळूक
कार्यक्रमात जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले की, केज तालुक्यात सुरू झालेला शिवसेनेचा विस्तार हा केवळ प्रारंभ असून, येत्या काळात आणखी शाखा स्थापन करून संघटन अधिक मजबूत करण्यात येणार आहे. संघटना मजबुत असेल तर विजय आपलाच आहे. यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने पक्षाच्या धोरणांनुसार काम करत जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

# अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून यश –कु.ऋचा ईश्वर जाधव हीची GPAT मध्ये उल्लेखनीय कामगिरी



घाटनांदुर प्रतिनिधी :अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते,याचे उत्तम उदाहरण कु.ऋच्या ईश्वर जाधव यांनी घालून दिले आहे. त्यांनी GPAT (राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा) मध्ये तब्बल 186 गुण मिळवत राष्ट्रीय स्तरावर 4325 रँक प्राप्त करून यश संपादन केले आहे.
या उल्लेखनीय यशामुळे जाधव कुटुंबासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.कठीण परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.कु.ऋच्या जाधव हिच्या या यशामागे त्यांची अथक मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन,मार्गदर्शन व पाठबळ महत्त्वाचे ठरले आहे.
या कामगिरीबद्दल विविध स्तरांतून तिचे अभिनंदन करण्यात येत असून,पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.अशा विद्यार्थ्यांमुळे परिसराचे नाव उज्ज्वल होत असून, भविष्यातही तिने अशीच प्रगती करावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी कटिबद्ध - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
## लाखो भाविकांच्या उपस्थितीत नारळी सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न

बीड दि. (प्रतिनिधी) 9 : - म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे पार पडलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या 94 व्या नारळी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका मांडली, “मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. गडाच्या विकासासाठी रस्ता असो वा अन्य कोणताही प्रश्न, तो सोडविण्यास मी कटिबद्ध आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले. संत वामनभाऊ महाराज यांनी सुरू केलेल्या या पवित्र परंपरेचा समारोप गुरुवारी (दि. ९) कल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी गहिनीनाथ गडाचे विठ्ठल महाराज, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, “संत वामनभाऊ यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नाथ



संप्रदायात गहिनीनाथांचे महात्म्य मोठे असून, या गडावर प्रत्येक काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे.”
विशेष म्हणजे, या नारळी सप्ताहाचे नियोजन २०३९ पर्यंत निश्चित झाले आहेत यातच या भक्तीकार्याचे यश दिसते .समाजाला एकत्र आणण्याचे हे काम अतिशय मोलाचे आहे असे मुख्यमंत्री म्हणाले पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी, “गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यजमानपदाखाली व्हावा व त्यांनी गड दत्तक घ्यावा,” अशी मागणी केली. तसेच स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या विचारांवर आपण काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.
आमदार धनंजय मुंडे म्हणाले की, “संत वामनभाऊ यांनी सुरू केलेला हा सप्ताह आज महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी होत आहे, हा योगायोग विशेष आहे. गेल्या २५ वर्षांपासून मला येथे पूजनाचा मान मिळत आहे.”

## अंड्यातून जन्मणारे सस्तन प्राणी “

प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी 8055440385

“आगळ्यावेगळ्या जीवसृष्टीचा वेध घेणाऱ्या या अभ्यासपूर्ण व ज्ञानवर्धक , विचारप्रवर्तक लेखाचा सुसूत्र,सविस्तर गोषवारा असा:—

निसर्गाच्या पसाऱ्यात प्रत्येक प्राण्याचे एक विशिष्ट असे स्थान आहे आणि त्यासाठीच तो प्राणी उत्क्रांतीच्या चक्रात निर्माण झालेला असतो. अंड्यातून जन्म घेणारे सस्तन प्राणी देखील याच नियमानुसार अस्तित्वात आले आहेत आणि एका विशिष्ट भूप्रदेशापुरते सीमित राहिलेले आहेत.असाच एक बुचकळ्यात टाकणारा प्राणी १८ वे शतक संपता संपता थेट ऑस्ट्रेलिया येथून युरोपमधल्या प्राणी तज्ज्ञांच्या समोर आला. या प्राण्याला त्याच्या सपाट,फताड्या पंज्यांवरून “ प्लॅटिपस “ म्हणजे सपाट पायाचा असेच नाव मिळाले. त्याच्या बदकासारख्या चोचीमुळे ‘डकबिल प्लॅटिपस ‘ असेही त्याला म्हणतात.हा प्राणी अभ्यासाअंती जगावेगळा आढळून आला.कारण हा सस्तन प्राणी असूनही अंडी घालताना आढळून आला.वीणीचा हंगाम वगळता प्लॅटिपस नदी किंवा जलाशयाच्या काठावर पाण्याच्या पातळीच्या सुमारे एक फूट वरती बिळ करून राहतात.अंडी द्यायची वेळ येते तेव्हा मादी अंड्यांसाठी वेगळे बिळ खोदते जे ६०-६५ फूट लांब असते. जलाशयाच्या पाण्याची पातळी वाढलीच तर सगळे पाणी आत शिरू नये म्हणून,त्यात अंतरा अंतरावर अडथळे उभारलेले असतात. प्लॅटिपसची मादी आधी सुमारे २८ दिवस आपल्या पोटातच अंडी उबवते आणि नंतर बाहेर काढून सुमारे १० दिवस पुन्हा उबवते.अंड्यातून बाहेर आलेली पिल्ले अतिशय नाजूक असतात,त्यांना दृष्टी नसते,त्यांच्या अंगावर केस नसतात.साधारण चार महिने प्लॅटिपसची मादी त्या बिळात आपल्या पिल्लांना वाढवते,मग ते बाहेर येऊन स्वतंत्रपणे जगू शकतात.

ऑस्ट्रेलिया खंडात सस्तन असून अंडी घालणारा आणखी एक प्राणी आढळून आला तो म्हणजे “इचिडना “.साळीसारखा दिसणारा हा लहानसा प्राणी ‘स्पायनी अ‍ॅन्ट इटर ‘ या नावानेही ओळखला जातो.इचिडना हा प्राणी उत्क्रातीच्या चक्रात सुमारे २० ते ५० दशलक्ष वर्षापूर्वी जन्माला आला. याचे पूर्वज जलचर होते,मात्र आज आढळणारे इचिडना भूचर आहेत.रोमन भाषेतील ‘इखिनॉस’ म्हणजे ‘हेजहॉग सी अर्चिन ‘ या नावावरून इचिडना हे नाव पडल्याचे मानले जाते. प्रामुख्याने वाळवी,मुंग्या यावर गुजराण करणाऱ्या इचिडनाला तोंडात दात नसतात.जमिनीत बिळ खोदण्यासाठी मजबूत पाय आणि मोठ्या, ताकदवान नख्या असतात.इचिडना मादीच्या पोटावर एक पिशवी असते,ती आपली अंडे त्याच पिशवीत घालते.दहा दिवसानंतर अंड्यातून जे पिल्लू बाहेर येते ते अतिशय नाजूक आणि अपुरी वाढ झालेले असते.ते पुढे ४५ ते ५५ दिवस याच पिशवीत राहते.नंतर आई त्याच्यासाठी मातीत एक खड्डा खणून पिल्लाला त्यात ठेवते.पिल्लू सात महिन्यांचे होईपर्यंत दर पाच दिवसांनी मादी त्याला दूध पाजायला येते.या इचिडनच्या चार प्रजाती आणि प्लॅटिपस असे फक्त पाचच सस्तन प्राणी अंडी देतात.त्यांचा ‘ ‘मोनोट्रेमाटा’ असा वेगळाच गट मानला जातो.या गटाबद्दल १९ व्या शतकापर्यंत पुरेशी माहिती नव्हती त्यामुळे ‘अर्ध रेप्टाइल्स’ प्रकारचे प्राणी सस्तन प्राण्यांच्या गटात सगळ्यात शेवटी निर्माण झाले आहेत आणि अतिशय दुय्यम स्तरातले आहेत असा समज होता.ही समजूत चुकीची असल्याचे पुरावे फॉसिल्सच्या रूपाने मिळाले.त्यावरून हे कळलं की ते प्राणी आजच्या प्लॅटिपसपेक्षा वेगळे होते.

प्लॅटिपस आणि इचिडना हे अंड्यातून जन्माला येणारे सस्तन प्राणी आणि इतर सस्तन प्राणी यांच्यात काही फरक पाहायला मिळतात.या दोघांना प्रौढावस्थेत इतर सस्तन प्राण्यांसारखे दात नसतात.इतर सस्तन प्राण्यांच्या तुलनेत यांचा चयापचयाचा वेगही अतिशय कमी असतो. याशिवाय प्लॅटिपस आणि इचिडना यांना मागच्या पायावर एक खुरासारखा अवयव असतो. इचिडनासाठी हा तसा निरूपयोगी अवयव असतो पण प्लॅटिपस मात्र या खुराच्या मदतीने आपले विष सोडतो.फक्त नर प्लॅटिपसनाच विष असते आणि त्याचा उपयोग भक्ष्य पकडण्यासाठी,इतर नरांशी लढण्यासाठी केला जातो

## जिल्ह्यात औद्योगिक विकासास चालना देण्यासाठी दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी आढावा बैठक

अहिल्यानगर,/प्रशांत बाफना दि. ९ एप्रिल: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील उद्योगांच्या अडचणींचे निराकरण करून जिल्ह्यात औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी, दर महिन्याच्या प्रत्येक चौथ्या सोमवारी दुपारी १२:०० वाजता ऑनलाईन आढावा बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील सुपा, शिर्डी, अहिल्यानगर, श्रीरामपूर व इतर सर्वच औद्योगिक क्षेत्रांतील उद्योजकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर त्वरित कार्यवाही करण्याच्या उद्देशाने या बैठकीचे नियोजन करण्यात आले आहे. बैठकीत प्रलंबित बाबी, तांत्रिक अडचणी आणि विविध विभागांमधील आवश्यक समन्वय यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

सदर बैठकीसाठी कायमस्वरूपी एकच गूगल मीट लिंक व बारकोड उपलब्ध करून देण्यात आला असून, संबंधित उद्योजकांनी या माध्यमातून सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

काही अपरिहार्य कारणास्तव किंवा सुटीमुळे नियोजित दिवशी बैठक होऊ न शकल्यास, ती पुढील दिवशी (मंगळवारी) दुपारी १२:०० वाजता आयोजित केली जाईल.

उद्योजकांनी त्यांच्या अडचणी निश्चित नमुन्यात भरून, बैठकीच्या दोन आठवडे आधी म्हणजेच महिन्याच्या दुसऱ्या सोमवारपर्यंत industrymh17@gmail.com या ई-मेलवर पाठवणे आवश्यक आहे. संबंधित विभागांनी उद्योगांच्या समस्यांना प्राधान्य देऊन त्या सोडवाव्यात आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती २० एप्रिल २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी, असे निर्देशही डॉ. आशिया यांनी दिले आहेत

## महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची प्रदेश कार्यकारिणी जाहीर
## गणेश उबाळे यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड

प्रतिनिधी, बीड - महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची विस्तारित प्रदेश कार्यकारणी मुंबई येथील प्रदेश कार्यालयातून प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. या नव्या कार्यकारणीत गेवराईचे गणेश उबाळे यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या या विस्तारित प्रदेश कार्यकारणीत, उपाध्यक्ष, सरचिटणीस, व सचिव अशा तब्बल १२४ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यकारणीत गेवराई तालुक्यातील गणेश उबाळे यांना महत्वाच्या अश्या प्रदेश सरचिटणीस पदावर जबाबदारी मिळाल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात समाधान व्यक्त होत आहे.



गणेश उबाळे यांनी यापूर्वी युवक काँग्रेसमध्ये सचिव पदावर म्हणून यशस्वीपणे काम केले असून आता प्रदेश सरचिटणीस माध्यमातून त्यांच्यावर आणखी मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील भेंड खुर्द येथील रहिवासी असलेल्या गणेश उबाळे यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर संघटनेत ठसा उमटवला आहे.

या नियुक्तीबद्दल बोलताना गणेश उबाळे यांनी सांगितले की, वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास ते निश्चितच सार्थ ठरवतील व संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करतील.

यावेळी त्यांनी माजी खासदार रजनी ताई पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, सहप्रभारी नवजोत सिंग संधू, तसेच महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आदित्य पाटील, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राहूल सोनवणे तसेच सर्व नेत्यांचे आभार मानले. गणेश उबाळे यांच्या निवडीमुळे बीड जिल्हा युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून युवक काँग्रेसच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास पदाधिकारी यांच्या कडून व्यक्त केला जात आहे.

## चालत्या बसचा जॉइंट तुटल्याने
## राहुरीत बस दुर्घटना होता होता टळली

अहिल्यानगर( प्रशांत बाफना)

राहुरी बस स्थानकात आज सकाळीच श्रीरामपुरला जाणाऱ्या एसटी बसचा जॉईन्ट तुटल्याने बस जागेवरच उतारावरून मागे सरकली , सुदैवाने दुर्घटना टळली . राहुरी बसस्थानकाचे सध्या काम मंद गतीने सूरु असून नगर मनमाड हायवेच्या डांबरीकरणामुळे बसस्थानकातून बाहेर जाणाऱ्या गाड्यांना साडेतीन ते चार फूट चढावरून ये जा करावी लागते .

त्यातच जुन्या झालेल्या बसेस ना अडचणी येतात .

आज सकाळी श्रीरामपूर डेपोची एसटी बस बसस्थानकातून निघताच याच बसस्थानकाच्या चढावर बसचा जॉइंट तुटला .

बस पुढे जाण्याऐवजी मागे सरकली . बस स्थानकावर काम चालू असल्याने कडेच्या खडीवर ती थांबली .सुदैवाने दुर्घटना टळली .

बस मधून प्रवासी बाहेर पडले . ही बस जुनी असल्याने हा प्रकार घडला असावा , अशी चर्चा प्रवाशांमध्ये सुरू होती .

बसस्थानकाचे काम सध्या मंद गतीने होत आहे . त्यामुळे बसचालकांसह प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे . एसटी महामंडळाने अनेक नवीन बसेस सुरू केले आहेत . शिवाई , शिवशाही , लालपरी , हायड्रोजन वर चालणारी बस मात्र जुन्या बसेस तशाच सुरू असल्याने एसटी महामंडळ एखाद्या दुर्घटनेची वाट पाहत आहे काय ? असा संतप्त सवाल आज प्रवासी व्यक्त करत होते . श्रीराममपूर बस डेपो मध्ये देखील अनेक जुन्या बसेस असून त्या बंद करून नवीन बसेस सुरू करण्याची मागणी होत आहे

## नायगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा
## कार्यक्रमातून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा दिला संदेश

केज:- प्रतिनिधी वर्ल्ड हेल्थ डे निमित्त आयुष्मान आरोग्य मंदिर धनेगाव अंतर्गत नायगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीत आरोग्यविषयक घोषवाक्ये देत माझे गाव आरोग्य संपन्न गाव, स्वच्छता, योग्य आहार, नियमित व्यायाम,क्षयरोग, व HPV लसीकरणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.




या प्रसंगी पुढील मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरमाळी,सरपंच विवेक खोडसे,आरोग्य सेवक मणियार कैफ, आरोग्य सेविका अनुराधा शिंदे, आशा स्वयंसेविका संध्याताई मुजमुले ,अंगणवाडी सेविका,मुमताज शेख,अभिलाषा मुजमुले, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब गोरे,यांच्यासह इतर शिक्षक बांधव यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ कार्यक्रमात सहभागी झाले होते. या उपक्रमातून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला

## प्रा. दामोदर मोरे अत्यंत प्रतिष्ठेच्या वसंत मून पुरस्काराने सन्मानित

( कल्याण / आशा रणखांबे)

ज्यांच्या विद्वत्तेची ख्याती महाराष्ट्राबाहेर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचली ते प्रा.दामोदर मोरे आज वसंत मून पुरस्कार मिळालेल्या डॉ गंगाधर पानतावणे, डॉ यशवंत मनोहर,वामन होवाळ आणि कुमुद पावडे यांच्या परंपरेत जाऊन बसले आहेत. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्राच्या भौगोलिक चौकटी ओलांडून प्रा. मोरे यांना अनेक मानसन्मान मिळाले आहेत. देशातील शंभर विद्वानांनी त्यांच्या कवितेवर लेख लिहिले आहेत. त्यांची कविता पूर्णपणे आंबेडकरवादी आहे. त्यांच्या कवितेचा गौरव म्हणजे आंबेडकरवादाचा गौरव आहे. तो मानवतेचा, समतेचा गौरव आहे. दामोदर मोरे हे राष्ट्रीय मान्यता मिळालेले कवी आहेत. म्हणूनच या प्रतिष्ठानला त्यांचा सन्मान करतांना अभिमान वाटत आहे.” असे प्रतिपादन ख्यातनाम साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. उल्हासनगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर



सभागृहात वसंत मून सोशल वेल्फेअर फौंडेशनच्या वतीने आयोजित पुरस्कार सोहळ्यात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते.

श्रीपाल सबनीस पुढे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य फक्त दलित समाजापुरते मर्यादित नव्हते. ते व्यापक होते. ज्ञान ही विश्वात्मक कल्पना आहे व ज्ञानाच्या व्यापक संदर्भात वसंत मून यांच्या कार्याचा परिप्रेषक वाढत विश्वापर्यंत जातो. सत्कारमूर्ती प्रा. दामोदर मोरे यांनी आपल्या भाषणात वसंत मून यांच्या कार्याचा गौरव केला. आणि त्यांच्या सोबतच्या अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या. यावेळी पद्मश्री कल्पना सरोज, डॉ.प्रकाश वाकोडे, महेश भारतीय, किरण सोनवणे यांचीही समयोचित भाषणे झाली.

याप्रसंगी अध्यक्ष डॉ श्रीपाल सबनीस, प्रमुख पाहुण्या उद्योजक पद्मश्री कल्पना सरोज, फौंडेशनच्या अध्यक्षा नगरसेविका अंजली साळवे, डॉ.चंद्रकांत साळवे यांच्या हस्ते दामोदर मोरे यांना अत्यंत प्रतिष्ठेचा पाचवा वसंत मून पुरस्कार देण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मान पत्र आणि एकवीस हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.या वेळी दामोदर मोरे यांना देण्यात आलेल्या सन्मान पत्राचे वाचन प्रा.सिंधू रामटेके यांनी केले. डॉ जलदा ढोके - गाणार यांच्या ‘ वसंत मून ( मराठी साहित्य आणि विचार विश्व ) या ग्रंथाचे प्रकाशन पाहुण्यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल केदारे यांनी केले.

या पुरस्कार सोहळ्याचे अत्यंत देखणे संयोजन फौंडेशनचे संचालक रोहित साळवे यांनी केले.या कार्यक्रमास मिलिंद मून, आय एम मोरे, शिवा इंगोले, शुक्राचार्य गायकवाड, नवनाथ रणखांबे, गिरीश लटके , आशालता कांबळे, दिलीप मालवणकर, डॉ मंगेश बनसोड, प्रशांत धांडे, संजय अभंग, अनुराधा वानखडे हे मान्यवर आणि प्रचंड जन समुदाय उपस्थित होता. उज्वला मिलिंद मून यांच्या आभार प्रदर्शनाने या शानदार कार्यक्रमाची सांगता झाली.

## फळांचा राजा आंब्याचे राजवैभव आले संकटात
## आमराई नामशेष होण्याच्या मार्गावर.

### प्रशासनाने वृक्षतोडीवर लक्ष देणे गरजेचे





मुजीब खान कन्नड

आमराई सध्या अखेरची घटका मोजत असून त्याचे जतन न झाल्यास आमराईचा अनमोल ठेवा येणाऱ्या पिढीस पाहावयासही मिळणार नाही तालुक्यात बोटावर मोजण्या एवढ्याच आमराई शिल्लक राहिल्या असून मोडकळीस आलेल्या झाडांच्या जागी नवीन झाडांची लागवड होणे आवश्यक आहे परंतु अलीकडे आंब्याच्या झाडांची सर्रास कत्तल होत असल्याने गावागावातील आमराई नामशेष होत चालल्या आहे अशी परिस्थितीमुळे फळांच्या राजा आंब्याचे राज वैभव संकटात सापडले आहे उन्हापासून माणसासह विविध पशु पक्षांना मायेची सावली देणारे झाड म्हणून आंब्याच्या व वृक्षाकडे पाहिली जाते आपल्या पूर्वजांनी लावलेल्या अनेक आंब्यांची जाती आजही आपण चाखत आहेत आमराईच्या रूपात आपल्या पिढ्यांसाठी लावलेली असंख्य झाडे म्हणजे त्यांचा दूरदर्शीपणाच पूर्वी आमराई म्हणजे प्रतिष्ठा समजली जायची शेतीचा उल्लेख आला की आमराईचा विषय पुढे यायचा शेतात बांधावर तसेच विहिरीजवळ गोलाकार किंवा रांगेत आंब्याची झाडे चवितही वैविध्य असायचे आंब्याचे झाड इतर झाडापेक्षा उंच विस्ताराने मोठे असते उन्हात प्रवास करणाऱ्या वाट सर्व नवनाची सबकी कमी करण्यासाठी आंब्याच्या सावलीला मोठा उपयोग होतो आंब्याचे झाड उंच असल्याने पावसासाठी याचा फायदा होतो हवेने वादळाने हे झाडे पडले तर त्याच्या लाकडाचा सरपणासाठी वापर केला जात असे बहुगुणी वृक्षाचा सध्या नायनाट होताना दिसत आहे अज्ञानी निरक्षर शेतकऱ्यांना ज्यादा पैशाची आम्हीच दाखवून आंब्याच्या आमरायाच मुळापासून तोडून नष्ट करीत आहे एकीकडे शासन गाव तिथे रस्ता व रास्ता तिथे झाडे लावण्यासाठी कोट्यावधींचा खर्च करून निसर्गाचे संतुलन राखण्याचा प्रयत्न करीत आहे दुसरीकडे शासनाकडून दलालाना आंब्याचे झाडे तोडण्यासाठी परवानगी दिल्या जाते आम वृक्ष दिवसें दिवस कमी होत आहे आज आंबा लागवड मोठ्या प्रमाणात होत असली तरी हे वृक्ष गावरान आंब्याची बरोबरी करू शकत नाही उंचीने कमी असलेले या झाडांना अधिक वजनाचे फळ आणि चव सारखीच राहते त्यामुळे जुन्या आमराईची बरोबरी हे वृक्ष करू शकत नाही आमराईचे सौंदर्य व आमराईशी जोडली गेलेली हात मी आता संपुष्टात येत असल्याचे चित्र सगळीकडे दिसत आहे त्यामुळेच आज गावरान आंबा चाखायला मिळतात सोडा पाहायला देखील मिळेनासा झाला आहे अलीकडे दरवर्षी पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महत्त्वाचा असलेल्या फळाचा राजा आंब्यांची होत असलेली कत्तल थांबवून तोडण्यावर. तोडण्याची परवानगी देणाऱ्या विभागावर कारवाई का होऊ नये असा सवाल ग्रामीण भागातील जनतेसमोर उभा राहत आहे

---

महसूल किंवा संबंधित खात्यामार्फत फक्त लिंब आणि बाभूळ या झाडांच्या तोडीचा परवाना दिला जातो उर्वरित सरक्षित झाडे व फळझाडे यांचा परवाना वनविभागा मार्फत दिला जातो आंबा झाड तोडीची परवानगी महसूल विभागामार्फत दिली जात नाही

## साहित्य रसिकांसाठी शांतीवन झाले सज्ज !

### साहित्यासी नाते घट्ट करण्यासाठी आपणही या !

शिरूर कासार/प्रशांत बाफना : तालुक्यातील आर्वी येथील सामाजीक प्रकल्प शांतीवन साहित्य रसिकांसाठी सज्ज झाले असुन साहित्यासी नाते घट्ट करण्यासाठी आपणही आवर्जून उपस्थित राहवे असे आवाहन शातीवन प्रकल्पाचे संस्थापक तथा साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष दिपक नागरगोजे यांनी केले आहे .

मराठवाडा साहित्य संमेलन चे हे ४५ वे वर्ष असुन हे संमेलन प्रथमच तालुक्यात होत असुन सामाजिक प्रकल्पावर देखील प्रथमतः च साहित्य सौरसांचा मेळावा संपन्न होत आहे . शनघवार रविवार असे दोन दिवस शांतीवनच्या हिरव्यागार नैसर्गिक वातावरणात साहित्याचे विविधांगी दर्शन घडणार आहे . साहित्य क्षेत्रातील दिग्गज साहित्तीक , कवि तसेच लेखक यावेळी तालुक्यात दोन दिवस संमेलनाला रंग भरणार असुन सामाजिक , राजकिय , शैक्षणीक व वृत्तपत्र सृष्टीतील सृजनशिल नेतृत्वाचे साहित्या बरोबर माणसाची जवळीक निर्माण अरणार आहे .

दोन दिवसीय साहित्य संमेलनासाठी शांतीवनवर मान्यवरांची भोजन निवास तसेच साहित्य रसिकांना देखील शांतीवन आपलेच आहे अशी अनुभुती मिळणार आहे . अनाथ , उपेक्षीत , अनौरस बाळांचे संगोपन करत त्यांच्या जिवनाला आणि जगण्याला नवी दिशा देणारा हा प्रकल्प आता साहित्य संमेलनाने उंचीवर जाणार आहे . मराठवाडा साहित्य संमलनाच्या माध्यमातून शांतीवनला साहित्य रसिकांची सेवा करण्याचे भाग्य लाभले आहे , तुम्ही देखील मोठ्या संखेने या साहित्य पंढरीचे वारकरी व्हा असे आवाहन शांतीवनचे तथा स्वागताध्यक्ष दिपक नागरगोजे व कावेरी नागरगोजे या सेवावृधारीने केले आहे

# राहुरी पोटनिवडणुकीत सात जण निवडणुकीच्या रिंगणात,

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी आज ९ एप्रिल या अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी ८ अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने भाजपाचे अक्षय शिवाजीराव कर्डिले, महाविकास आघाडीकडुन शरद पवार गटाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीकडुन संतोष चोळके असे तिरंगी लढतीचे चित्र स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून प्रहार संघटनेचे सुरेश लांबे, उबाठा शिवसेनेचे रावसाहेब खेवरे, महेश हापसे, अर्थव म्हसे हे नशीब अजमावत आहेत. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरी विधानसभा मतदारसंघाची २३ एप्रिलला पोटनिवडणुक होणार आहे. ९ एप्रिल या अखेरच्या दिवशी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केलेले बाळासाहेब जाधव, नागेश जाधव, अनिल जाधव, नामदेव पवार, सविता शेटे, संभाजी धोंडे, साहेबराव म्हसे, रविंद्र मोरे या आठ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत.

उमेदवारी अर्ज माघारीचा आज अखेरचा दिवस असल्याने काही अपक्ष उमेदवार नॉटरिचेबल झाले होते. वंचित बहुजन आघाडीकडुन संतोष चोळके हे निवडणूकीला सामोरे जातील अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी राहुरी येथे प्रसार माध्यमाशी बोलताना दिली.

सुरुवातीला ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता वर्तवली जात होती. कारण राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी अचानक माघार घेतली होती. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तनपुरेंची भेट घेतल्यानंतर त्यांनी 6 एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला. या घडामोडीनंतर राजकीय वर्तुळात ही निवडणूक बिनविरोध होणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र, शेवटच्या टप्प्यात राजकारणाला अनपेक्षित वळण मिळालं. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मास्टरस्ट्रोक खेळत गोविंद मोकाटे यांना उमेदवारी जाहीर केली आणि निवडणुकीत ट्विस्ट आला. त्यामुळे भाजपसमोर थेट लढत उभी राहिली आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीनेही संतोष चोळके यांना उमेदवारी देत निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे तिसरा महत्त्वाचा पर्याय मतदारांसमोर उभा राहिला आहे. अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज दाखल केल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, बिनविरोध होण्याच्या उंबरठ्यावर असलेली राहुरी पोटनिवडणूक आता बहुरंगी आणि चुरशीची होणार आहे. भाजपचे अक्षय कर्डिले यांच्यासमोर आता केवळ औपचारिक लढत नसून, राष्ट्रवादी आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांमुळे खरी कसोटी लागणार आहे

# ब्रेक निकामी झाल्याने करंजी घाटात ट्रक पलटी;वॉटपार्कमध्ये भयानक दुर्घटना;

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना
नगर ते पाथर्डी महामार्गावरील करंजी घाटात आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास भंगार मटेरियल घेऊन जाणाऱ्या ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने ट्रक पलटी झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र ट्रकमधील मोठ-मोठे लोखंडी पाईप रस्त्यावर आडवे झाल्याने सुमारे एक तास वाहतुकीची कोंडी झाली होती.

नगर ते पाथर्डी महामार्गावरील करंजी घाटात आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पुण्यावरुन जालना येथे मोठ-मोठे चौकोनी



पाईप घेऊन जात असलेल्या ट्रकचे (एमएच २४ ए यु-३५९०) ब्रेक करंजी घाटात निकामी झाल्याने ट्रक घाटाच्याकडेला पलटी झाला.



या ट्रकमधील चौकोनी लोखंडी पाईप मात्र रस्त्यावर आल्याने या महामार्गावरील वाहतुक सुमारे एक तास खोळंबली होती.

या अपघातात ट्रक चालक दत्तात्रय हरिभाऊ बांगर (रा. कासारी, ता. केज, जि. बीड) याने ट्रकचे ब्रेक निकामी होऊनही प्रसंगावधान दाखविले. ट्रक घाटाच्याकडेला खड्ड्यात जाऊन पलटी झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच महामार्गावर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. या दरम्यान एक तास वाहतुकीची कोंडी झाली होती. महामार्ग पोलिसांनी वाहतुक सुरळीत केली

# जिंतूर येथे भीमजयंती निमित्ताने अविनाश भारती यांच्या किर्तनाचा कार्यक्रम



जिंतर/बळीराज भराडे (दै. संघर्ष) दि 10/04
विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135व्या जयंती निमित्ताने आज दि(10) रोजी सायंकाळी 6 वाजता जिंतूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे महाराष्ट्रातील ख्यातनाम परिवर्तनवादी किर्तनकार किर्तन केसरी अविनाश महाराज भारती यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला जिंतूर शहर आणि तालुक्यातील प्रशासनातील अधिकारी तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश दरगड कार्यक्रमाचे उद्घाटक बाळासाहेब भांबळे स्वागताध्यक्ष इस्माईल पहेलवान डॉ देवराव कऱ्हाळे उपस्थित राहणार असून याप्रसंगी परभणी जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा लताताई वाकळे यांचा समाज बांधवांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला उपस्थीत राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष दिलीप माघाडे, निमंत्रक रत्नदीप शेजावळे भगीरथ मिरासे सतीशभैय्या वाकळे सुखदेव वाहूळे खुशाल घनसावध प्रवीण वाकळे भास्कर सुरवसे शंकर वाघ बाळासाहेब घुगे यांनी केले आहे.

# दिंद्रुड पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी; चोरी गेलेला मोबाईल शोधण्यास यश

**चोराला पकडण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांनी आपली टीम कामाला लावली होती.**

किल्ले धारूर( प्रतिनिधी)
काही दिवसापूर्वी तेलगाव ते पुणे प्रवासा दरम्यान मोबाईल चोरी गेला होता या मोबाईलचा शोध घेऊन चोरी गेलेला मोबाईल परत मिळवून देण्यासाठी दिंद्रुड पोलिसांनी वेगाने तपास करून मोठ्या शिताफीने मोबाईल चोर पकडला त्यामुळे दिंद्रुड पोलिसांचे कौतुक होत आहे. सत्यशोधक ओबीसी परिषदेचे नेते बाळासाहेब सोनटक्के हे खाजगी ट्रॅव्हल्स मध्ये तेलगाव वरून पुण्याला जात होते मात्र रात्रीच्या प्रवासात त्यांचा मोबाईल चोरीला गेला गाडीतील प्रवासी चोराने मोबाईल चोरून पळ काढला होता. त्यानंतर बाळासाहेब सोनटक्के यांनी दिंद्रुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने दिंद्रुड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे साहेब यांनी अत्यंत वेगाने तपास सुरू केला. मोबाईल शोधण्यासाठी जी प्रक्रिया करावी लागते ती प्रक्रिया करून चोराला पकडण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांनी आपली टीम कामाला लावली होती. शेवटी या टीमला मोबाईल चोर पकडण्यात यश मिळाले. पोलीस



निरीक्षक ढाकणे व पोलीस अंमलदार श्री सचिन गायकवाड यांनी या कामांमध्ये

वैयक्तिक लक्ष घालून त्या मोबाईल चोराचा शोध घेतला व मोबाईल चोराच्या मुसक्या आवळल्या त्यामुळे पोलीस निरीक्षक ढाकणे व पोलीस अंमलदार सचिन गायकवाड यांच्यासह अनेक पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक होत असून चोरीला गेलेला मोबाईल परत मिळून दिल्याने सत्यशोधक ओबीसी परीषदे नेते बाळासाहेब सोनटक्के यांनी श्री pi महादेव ढाकणे साहेब व त्यांचे रायटर सचिन गायकवाड यांचे विशेष अभिनंदन केले.

# सावळदबारा वन कार्यालयासमोर घाणीचे साम्राज्य; प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिक संतप्त..

सोयगाव ता.. प्रतिनिधी सुनील चोरमले.. .सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील वन विभाग कार्यालयासमोर व परिसरात मोठ्या प्रमाणावर घाण व कचऱ्याचा साच झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



कार्यालयाच्या गेटसमोर तसेच अंगणात उखाड्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असून याकडे अजिंठा वन विभाग व स्थानिक वन कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.
कार्यालय परिसरात मोठमोठी झाडे, काटेरी झुडपे उगवून आली आहेत. तसेच एक बाभळीचे झाड गेल्या दोन वर्षांपासून पडून असून त्याचे काटे येणाऱ्या-जाणाऱ्यांना व शेजारील पशुवैद्यकीय दवाखान्यातील जनावरांना त्रासदायक ठरत आहेत.
या घाणीमुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून मच्छर व रोगराईचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे, वन कार्यालयाच्या शेजारीच प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे रुग्णांनाही या अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.पशुवैद्यकीय अधिकारी नागरगोजे यांनी वेळोवेळी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना साफसफाईबाबत सूचना दिल्या असल्याचे सांगितले, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. दरम्यान, प्रशासन झोपेचे सोंग घेत असल्याचा आरोप करत नागरिकांनी वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून परिसराची स्वच्छता करावी व नियमित देखभाल करावी, अशी मागणी केली आहे.

# शिरूरकरासारखा पुणेकरांनी घातला दंडवत व झाडला रस्ता !

**ढक्कु भाकरी नंतर दाळभाटी ,जिरा राईस ,गोड लापसी आणि चवदार थंड मठ्ठा !**





शिरूर कासार/प्रशांत बाफना :
येथील कुलस्वामिनी कालिका देवीच्या नवसपुर्ती नंतर आराधना घालण्याची प्रथा असुन यावेळी घरापासुन मंदिरापर्यंत कुटूंब प्रमुख सुवासिनींनी रस्ता झाडत दंडवत जाण्याची एक आगळी परंपरा आहे , शिरूर प्रमाणे आता पुणेकर कासार समाज देखील आराधना घालू लागले असुन जी प्रथा शिरूरला तीच पुण्याला करू लागले आहे .
प्रथम आराधना पंच म्हणजेच संस्थानचे विश्वस्त घालत असतात यावेळी देखील पंचाने ढक्कू भाकरीच्या आराधना घातल्या व पुणेकरांनी त्याची ऋची चाखली , त्यानंतर दंडवत घालणे ही प्रथा देखील पुणेकर महिलांनी अमलात आणली .
मोठ्या शहरात घरापासून मंदिरापर्यंतचे अंतर जास्त असल्याने मंदिराचे प्रवेशद्वारापासुन हातात अंब्याचा



ढगळा घेऊन रस्ता झाडत दंडवत घालण्यात संकोच बाळगला नाही . आराध्य देवतेची उपासना म्हणून निसंकोचपणे उपासना करत असुन समाजाकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे .
आराधनाचे यजमान ! प्रा सुभाष दगडे , प्रशांत (माऊली ) पांडूरंग भांडेकर (आळंदी ) संजय कोळपकर व कांचन कोळपकर यांनी यजमानपद सांभाळून जवळपास सहाशे पन्नास भाविकांनी आराधनाच्या ऋचीभोजनाचा स्वाद घेतला

# जिल्ह्यातून तिघे हद्दपार; एसपी सोमनाथ घार्गे यांनी काढले आदेश

अहिल्यानगर | प्रशांत बाफना नेवासा तालुक्यात अग्नीशस्त्रासह खुनाचा प्रयत्न, दरोडे, मारहाण, धमक्या अशा गंभीर गुन्ह्यांद्वारे दहशत निर्माण करणाऱ्या टोळीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या टोळीतील तीन जणांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, टोळी प्रमुख शुभम विश्वास उर्फ विश्वनाथ गर्जे (वय २९, रा. वड्डुले) याच्यासह आकाश उर्फ दत्ता सावंत (वय २७, रा. चिलेखणवाडी) आणि योगेश मच्छिंद्र सावंत (वय १८) यांनी एक संघटित गुन्हेगारी टोळी तयार करून नेवासा परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले होते. या टोळीवर खुनाचा प्रयत्न, दरोडा, मारहाण, शिवीगाळ, दमदाटी, गुंगीकारक पदार्थांची विक्री, तसेच अग्नीशस्त्र बाळगणे यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. २०१७ ते २०२५ या कालावधीत या टोळीने सातत्याने गुन्हे केले असून, यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्यांच्या वर्तनात सुधारणा झालेली नव्हती. टोळीच्या दहशतीमुळे सामान्य नागरिक पुढे येऊन तक्रार करण्यास घाबरत होते. भविष्यात गंभीर गुन्हे टाळण्यासाठी ही टोळी विखुरणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी नमूद केले.नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी चौकशी करून अहवाल दिल्यानंतर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या तिघांना अहिल्यानगर जिल्ह्यातून ३ महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले. जिल्ह्यात संघटित गुन्हेगारी रोखण्यासाठी अशा टोळ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले आहे

# लोकनेते गोपिनाथराव मुंढे शिक्षक सहकारी पत संस्थेला

**एक कोटी पंचेचाळीस लाख ७३ हजाराचा नफा !**

शिरूर कासार/प्रशांत बाफना :
तालुक्यातील अर्थक्षेत्रात अग्रगण्य असलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंढे शिक्षक सह पतसंस्थेला या वर्षी एक कोटी पंचेचाळीस लाख ७३ हजार एव्हढा नफा झाल्याचे पतसंस्थेचे चेअरमन मधुकर सानप यांनी सांगितले.
शिरूर तालुक्यातील ५२३ शिक्षक सभासदाच्या हक्काची व ऐन वेळी कामाला येणारी ही संस्था असुन मोठ्या विश्वासाने शिक्षक सभासद आपली ठेव तसेच कर्ज असा व्यवहार करत असतात . या व्यवहारातुन संस्था अनेक शिक्षक व त्यांचे पाल्य यांचेसाठी उपक्रम रगबवत असते , वर्षाखेर लेखाजोखा सादर केल्यानंतर संस्थेला एक कोटी पंचेचाळीस लाख एव्हडा नफा झाला आहे . अत्यंत पारदर्शी व्यवहार करत शिक्षक सभासदांच्या विश्वासाला ही संस्था पात्र ठरलेली आहे , सध्या अनेक पतसंस्थेच्या बाबतीत विश्वासार्हता गमगवली गेली असल्याचे बोलले जात असले तरी शिक्षकांच्या या संस्थेने विश्वास अधिक बळकट केला असल्याचे संस्थेचे चेअरमन मधुकर सानप यांनी सांगितले .



पतसंस्थेचा लेखा जोखा ! भागभांडवल १४६८५००९०
सभासद कायम ठेव ५२०७७००
गंगाजळी ७०६७०९१
शिक्षक कल्याण निधी ९५२६९३७
सभासद मुदत ठेव ६५६००००
एकुण नफा १ कोटी ४५ लाख ७३ हजार २३५ असा झाला . यावेळी उपाध्यक्ष लखुळ मुळे , सचिव विष्णू मिसाळ , खजिनदार जिवन खेडकर , माजी चेअरमन दिलचप जायभाये , संचालक सुभाष कंठाळे , अनंत सानप , परसराम खेडकर , विनायक कीर्तने , सुभाष सांगळे , संजय ढाकणे , भगवान माने , गोरख मिसाळ , मुबारक शेख , रंजना फुंदे , अल्का बांगर , व व्यवस्थगपक बबनराव जगतगप उपस्थित होते

# सिल्लोडमध्ये मतदार यादी पुन:निरीक्षण मोहिमेचा आढावा संदीपान भुमरे यांच्या उपस्थितीत शिवसैनिकांना मार्गदर्शन..

**बोगस व दुबार नावं हटवून यादी शुद्ध करण्यावर भर
नवीन मतदार नोंदणी व दुरुस्ती वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन**




सोयगाव ता.. प्रतिनिधी सुनील चोरमले.. सिल्लोड येथील जनसंपर्क कार्यालय, शिवसेना भवन येथे मतदार यादीच्या विशेष सखोल पुनःनिरीक्षण (SIR) मोहिमेबाबत शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीस खासदार संदीपान भुमरे यांची प्रमुख उपस्थिती होती.बैठकीदरम्यान शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना मतदार यादीतील दुबार, बोगस तसेच संबंधित भागात वास्तव्यास नसलेल्या मतदारांची सखोल पडताळणी करून यादी शुद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच नवीन मतदारांची नोंदणी आणि आवश्यक दुरुस्ती वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रत्येक बूथ स्तरावर संघटन अधिक मजबूत करत नागरिकांपर्यंत थेट पोहोचून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.या बैठकीस जिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड, जि.प. शिवसेना गटनेता राधाकिसन पठाडे, माजी सभापती चंद्रकांत जाधव, केशवराव तायडे, प्रभाकर काळे, नगराध्यक्ष अब्दुल समीर, धरमसिंग चव्हाण, विश्वास दाभाडे, देविदास पालोदकर, सय्यद नासेर हुसेन यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दैनिक लोकआरंभ
शुक्रवार १० एप्रिल २०२६
www.lokaarambh.com



# लग्नाआधी नवरीला बोलावलेलं, अशोक खरातचं सर्वात घाणेरडं सत्य समोर

## लग्नाआधी नेमकं काय घडलेलं?

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी रोज नवीन खुलासे होत आहे. लोकांची भक्ती आणि विश्वासाचा फायदा घेत त्याने अनेक उद्योजकांना फसवलं आहे, तर अनेक महिलांचं लैंगिक शोषण केलं आहे. भोंदूबाबाचे काळे कृत्य समोर आल्यानंतर अनेकांचा विश्वासच बसत नाहीये की, ज्याच्या पायाची धूळ कपाळावर लावायचो... ती व्यक्ती सर्वांच्या भावनांसोबत खेळत आहे... भोंदूबाबा बद्दल अनेक खुलासे होत असताना अन्य एका महिलेने भोंदूबाबाचा खरा चेहरा समोर आणला आहे. महिलेचं लग्न ठरलं होतं, पण लग्नाच्या आधी अशोक खरात याने तिला ऑफिसमध्ये बोलावलं आणि तिच्यावर बलात्कार केला. त्या काही मिनिटांत काय काय झालं... यावर



महिलेने धक्कादायक खुलासा केला आहे. तुझं कन्यादान स्वतः करेल म्हणत केलं घाणेरडं काम...

पीडितेने कॅप्टन बाबा उर्फ अशोक खरातविरुद्ध पहिला एफआयआर दाखल केला आणि त्याचं भीषण सत्य सर्वांना सांगितलं. महिला म्हणाली, '2019 मध्ये खरात बाबाला पहिल्यांदा भेटली होती. त्याने माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि सांगितलं तू माझी सर्वात आवडती मुलगी आहेस... तुझं कन्यादान मीच करेल... बाबाचे हे शब्द ऐकल्यानंतर मला प्रचंड आनंद झाला... त्यानंतर सर्व कुटुंबियांना भेटण्यासाठी मी घेऊन गेले... त्यानंतर माझं लग्न देखील होणार होतं... तेव्हा लग्नाच्या आधी दर्शन घेण्यासाठी बाबाने मला आश्रममध्ये बोलावलं होतं... '2022 मध्ये पीडित महिलेचं लग्न होणार होतं. महिला म्हणाली, 'माझ्या होणाऱ्या पतीसोबत मी आशीर्वाद घेण्यासाठी पोहोचले. तेव्हा बाबाने सांगितलं लग्नाआधी ईशान्येश्वर महादेव मंदिरात सिद्धपूजा करावी लागेल. त्यासाठी तुला एक दिवस यावं लागेल... त्यानंतर तुला भविष्यात कोणत्याच अडचणी येणार नाहीत. "मग त्याने मला पूजेच्या विधींबद्दल सांगण्यासाठी त्याच्या ऑफिसमध्ये बोलावलं. त्याने आतून दरवाजा बंद केला आणि म्हणाला- काळजी करू नकोस, मी तुला पुष्कराज देत आहे, तुझ्यासोबत सर्व काही ठीक होईल. येथे त्याने मला थोडा प्रसाद दिला, जो खाल्ल्यानंतर मी बेशुद्ध पडले. येथे त्याने माझ्यावर पहिल्यांदा बलात्कार केला. यानंतर, त्याने नोव्हेंबर 2022 ते डिसेंबर 2025 पर्यंत तीन वर्षे मला मादक पदार्थ देऊन माझ्यावर बलात्कार केला. पीडितेने सांगितले की, बदनामीच्या भीतीने मी आणि माझे कुटुंब पुढे आलो नाही... आता याप्रकरणी पोलीस कसून चौकशी करत आहेत.

## आमदार संजना जाधव यांची सोसायटीच्या प्रतिनिधी म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली



मुजीब खान कन्नड______
( उपनगरअध्यक्ष अ. जावेद यांनी सहकार्य केले )जिल्हा मध्यवर्ती

बँकेच्या निवडणुकीसाठी रिठी मोहडा विविध कार्यकारी सोसायटीच्या प्रतिनिधी म्हणून आमदार संजय जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली सोसायटीने घेतलेला हा ठराव म्हणजे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे निवडणुकीत आमदार संजनाताई यांची इंट्री असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत या निवडणुकीत कन्नड नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष यांनी सहकार्य केले सर्व संचालक चेअरमन व्हाईस चेअर मन आणि सभासदांनी या ठरावाला बहुमताने साथ दिली कन्नड तालुक्यामध्ये एकूण. १०० विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी आहेत बँकेच्या निवडणुकीत सहकारी संस्था मतदार संघातून प्रतिनिधी निवडून तिला जा तुझ्या उमेदवाराला सोसायटीयांनी मतदानाचा अधिकार प्रदान केलेला प्रतिनिधी मतदान करतो त्यामुळे या सोसायटीमधून बँकेचा ठराव आपल्या समर्थकाला मिळावा यासाठी इच्छुक प्रयत्नशील आहेत

## छेडछाडीविरोधात आता तातडीने मिळणार पोलीस संरक्षण

## महिला सुरक्षेसाठी 'शी-बॉक्स' पोर्टलचे अद्ययावतीकरण

अहिल्यानगर/प्रशांत बाफना , दि. ९ एप्रिल :- कामाच्या ठिकाणी होणारा महिलांचा लैंगिक छळ रोखण्यासाठी महिला एवं बाल विकास मंत्रालय मार्फत कार्यान्वित करण्यात आलेल्या 'शी-बॉक्स' (SHe-Box) या ऑनलाइन प्रणालीची व्याप्ती आता लक्षणीयरीत्या वाढविण्यात आली आहे. अद्ययावत करण्यात आलेल्या या पोर्टलद्वारे महिलांना आता केवळ कार्यस्थळावरील छळच नव्हे, तर सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाड, शेरेबाजी किंवा रस्त्यावरील उपद्रवी प्रकारांविरोधातही थेट तक्रार नोंदवता येणार आहे. पूर्वी 'शी-बॉक्स' पोर्टलचा वापर प्रामुख्याने 'कार्यस्थल पर महिलाओं का यौन उत्पीड़न (रोकथाम, निषेध एवं निवारण) अधिनियम, २०१३' अंतर्गत तक्रारींसाठी मर्यादित होता. मात्र, नव्या अद्ययावतीकरणामुळे महिलांच्या सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हे पोर्टल (https://shebox.wcd.gov.in) प्रभावी ठरणार आहे. 'शी-बॉक्स' ही केंद्र सरकारची एक एकात्मिक तक्रार नोंद प्रणाली असून, ती सरकारी, खासगी तसेच असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी खुली आहे. या पोर्टलवर तक्रार नोंदवल्यानंतर ती संबंधित आंतरिक समिती किंवा स्थानिक समितीकडे स्वयंचलितपणे पाठवली जाते. देशभरातील मंत्रालये, विभाग, जिल्हे आणि पोलीस यंत्रणांशी डिजिटल जोडणी, नोडल अधिकाऱ्यांमार्फत तक्रारींचे निरीक्षण, ९० दिवसांच्या कालावधीत चौकशी पूर्ण करण्याची तरतूद, तक्रारदाराची गोपनीयता पूर्णपणे सुरक्षित ठेवणे आणि प्रकरणांच्या प्रगतीवर ऑनलाइन लक्ष ठेवण्याची सुविधा ही या पोर्टलची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. महिलांना अगदी सोप्या पद्धतीने ऑनलाइन तक्रार नोंदवता येते. पोर्टलवर जाऊन "Register Your Complaint" पर्याय निवडावा, मोबाईल क्रमांक नोंदवून OTP द्वारे लॉगिन करावे, त्यानंतर स्वतःची माहिती, कार्यस्थळ किंवा घटनास्थळ, छळाचा प्रकार आणि आरोपीची माहिती भरावी. आवश्यक असल्यास पुरावे अपलोड करून तक्रार सबमिट केल्यानंतर रेफरन्स नंबरद्वारे स्थिती ट्रॅक करता येते. जर संबंधित संस्थेची IC नोंदणीकृत नसेल, तर तक्रार आपोआप जिल्हा किंवा राज्य स्तरावरील समितीकडे पाठवली जाते. अद्ययावत प्रणालीमुळे तक्रार प्राप्त होताच संबंधित परिसरातील पोलीस ठाण्याला तातडीने माहिती पाठवली जाते. त्यामुळे प्रशासकीय विलंब टळून पोलिसांकडून त्वरित मदत मिळणे आणि संशयितांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होते. तक्रार नोंदविल्यानंतर पोर्टलवर लॉगिन करून "Track Your Complaint" विभागात जाऊन रेफरन्स नंबर, मोबाईल किंवा ईमेल वापरून तक्रारीची सद्यस्थिती, चौकशीची प्रगती आणि निकाल पाहता येतो. ईमेल व एसएमएसद्वारेही अद्ययावत माहिती मिळते. 'शी-बॉक्स' पोर्टल हे सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यपरिसर निर्माण करण्यासाठी तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरत आहे. डिजिटल यंत्रणेमुळे तक्रारींचे जलद निपटारा, पारदर्शकता आणि जबाबदारी वाढण्यास मदत होत आहे. "महिलांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने 'शी-बॉक्स' पोर्टल अधिक सक्षम केले आहे. महिलांनी या सुविधेचा प्रभावी वापर करून छळाविरोधात पुढे यावे. तक्रार प्राप्त होताच पोलिसांकडून तात्काळ मदत उपलब्ध करून दिली जाईल," असे आवाहन महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी केले आहे

# अहिल्यानगर झेडपीचा गलथान कारभार...!

## रोहयोअंतर्गत अपात्र विहीरींच्या प्रकरणात गटविकास अधिकाऱ्याला पाठीशी घालत दोघांचं निलंबन...!

### दुसरं प्रकरण उद्भवलं असताना पहिल्या प्रकरणातल्या प्रस्तावांच्या फायलीच सापडेनात...

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना

अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा कारभार हा 'आंधळं दळतंय आन् कुत्रं पीठ खातंय', आशा पठडीतलाच आहे. कारण या जिल्हा परिषदेत कोणाचाच कोणाला पायपोस राहिलेला नाही. अधिकारी काय करताहेत, हे कर्मचाऱ्यांना कळायला तयार नाही आणि कर्मचारी काय करताहेत, हे अधिकाऱ्यांना कळायला तयार नाही. अशा अंदाधुंद आणि बेबंदशाही कारभारामुळे सामान्य जनता प्रचंड वैतागली आहे. अधिकारी बदलून गेले तरी सामान्यांच्या अडचणींत मात्र कमालीची वाढ होताना दिसत आहे. 'मिनी मंत्रालय' अशी ओळख असलेली ही स्थानिक स्वराज्य संस्था खरं तर नगर जिल्ह्याच्या विकासाचा महत्त्वपूर्ण असा सेतू आहे. परंतू या स्थानिक स्वराज्य संस्थेत काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी हे या जिल्ह्यातल्या जनतेवर आपण प्रचंड उपकार करत असल्याच्या अविर्भावात काम करत आहेत. अर्थात सारेच अधिकारी असं वागत नाहीत, हा भाग वेगळा. याचं महत्त्वाचं आणि ज्वलंत असं उदाहरण म्हणजे नगर जिल्ह्यातल्या पाथर्डी तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत काही विहिरींचं खोदकाम करायचं होतं. यामध्ये १४ विहिरींचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले होते. विशेष म्हणजे या संदर्भातले १३८ प्रस्ताव वर्षभराच्या कार्यकाळात आढळून आलेले नाहीत. मात्र या गंभीर प्रकरणात गटविकास अधिकाऱ्याला (बीडीओ) पाठीशी घालत चक्क दोघांविरुद्ध वरिष्ठांकडून कारवाई करण्यात आली. गंभीर बाब म्हणजे अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या एका विभागात असंच आणखी दुसरं प्रकरण उद्भवलेलं असताना पहिल्या प्रकरणातल्या प्रस्तावांच्या फायलीच या जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना सापडत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांचा कारभार म्हणजे 'आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं', याच पठडीतला असल्याचं स्पष्ट झालं आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या पाथर्डी तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून खोदण्यात येणाऱ्या १४ विहीरी अपात्र करण्यात आल्या. यासाठी सुमारे २१ लाख १६ हजार रुपये खर्च अपेक्षित होता. डिसेंबर २०२४-२५ या कालावधीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी तब्बल १ कोटी ५७ लाख रुपयांचा अपहार केल्याचं चौकशीतून निष्पन्न झालं आहे. या अपहरप्रकरणी चक्क गटविकास अधिकाऱ्याला (बीडीओ) पाठीशी घालण्यात आलं. तर सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (एपीओ), लिपिक कम डाटा आपरेटर, (कंत्राटी बेसवर नियुक्ती) विस्तार अधिकारी (पर्मनंट नियुक्ती) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्याला वरदहस्त तर कनिष्ठांविरुध्द कारवाई करण्याचा पराक्रम अहिल्यानगर जिल्हा परिषदेत करण्यात आला आहे.

दरम्यान, या जिल्हा परिषदेत आणखी एक घोटाळा उघडकीस आला असून त्या घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी दिले असल्याची जोरदार चर्चा ऐकायला मिळत आहे

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड, दि,09, (जिमाका):- बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात 14 एप्रिल 2026 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असल्याने संपूर्ण जिल्हयात पुढील कालावधीत महिनाभर जयंती मिरवणूका निघत आहेत.तसेच विविध राजकीय पक्ष, संघटेच्या वतीने त्यांचे न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक 11 एप्रिल 2026 रोजीचे 00.01 वाजेपासून ते दि.25एप्रिल 2026 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# संघटन सृजन अभियान अंतर्गत देशातील तळागाळात काँग्रेस पक्ष बळकटी साठी विशेष प्रयत्न करणार - पक्ष निरीक्षक - नीतू वर्मा

### काँग्रेस सक्षमीकरणासाठी बीड जिल्ह्यात तगड्या नेत्याची गरज

शिरुरकासार/प्रशांत बाफना


अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष मलिकार्जून खर्गे व लोकसभा विरोधीपक्ष नेते राहुलजी गांधी यांच्या आदेशाने व काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी प्रत्येक जिल्हा व प्रत्येक तालुक्यात संघटन सृजन अभियान हा कार्यक्रम जाहीर केला आहे. शिरूर (कासार) तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्याची यांची बैठक सोमवारी (दि.६)शिरूर येथे पार पडली. त्यानंतर प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे विचार व पक्ष वाढीसाठी च्या सुचना जाणुन घेतल्या,एआयसीसी मेंबर, नितुजी वर्मा खास दिल्लीवरून बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत जाऊन प्रत्यक्ष कार्यकर्तेचे मतं जाणून घेत आहेत या संघटन सुजन अभियाना मध्ये दिल्लीवरून आलेल्या एआयसीसी मेंबर, नितु वर्मा . त्यांच्या समवेत माजीआमदार.एम.एम.शेख सुरेंद्र गोडजकर (संगठन निरीक्षक) श्रीमती विद्याताई पाटील (प्रदेश समन्वयक)

प्रवीण जी सेफ , बिपिनचंद्र उर्फ (बाळासाहेब )ठोंबरे साहेब शिरूर तालुका अध्यक्ष भास्कर केदार बीड तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे सिराज भाई यांच्या नेतृत्वामध्ये पार पडली.

त्यानंतर त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करत सांगितले की येणाऱ्या काळामध्ये काँग्रेसमध्ये मोठा बदल पाहिला मिळणार आहे. महाराष्ट्र सहित , देशांमध्ये खूप मोठे बदल होतील. येणाऱ्या काळामध्ये काँग्रेसची सत्ता असेल. गावागावातून, तालुक्यातून, जिल्ह्यातून राज्यातून नवीन लोकांना संधी देण्यात येणार आहे. काँग्रेसमध्ये येणाऱ्या इच्छुक नागरिकांनी मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये सामील व्हा. असे आव्हान त्यांनी केले आहे.याप्रसंगी उपस्थित . शिरूर तालुका अध्यक्ष भास्कर केदार.अशोक बहिरवाळ, रामेश्वर शेळके. रमेश सानप, दादासाहेब तासतोडे,संजय खटाणे, हरिभाऊ सावंत, संभाजीराव जाधव ,अशोक केकान ,अशोक केदार, महादेव सावंत, आसिफ शेख, विठ्ठलराव लादे ,गणेश गिरी, सुरेश केदार, दादासाहेब केदार, जयराम केदार, अतुल खेंगरे, बाळासाहेब केदार,रामदास केदार, ज्ञानेश्वर केदार, ऋषिकेश केदार, पोपट केदार, कैलास संतोष नागरगोजे ज्ञानेश्वर ढवळे विलास बेळगे कांबळे ,राजेंद्र केदार, उपस्थित होते

### काँग्रेस सक्षमीकरणासाठी बीड जिल्ह्यात तगड्या नेत्याची गरज

बीड जिल्हा सध्या काँग्रेस मरण अवस्थेत आहे काँग्रेस पक्षाची ताकद अतिशय क्षीण झालेली आहे एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या या जिल्ह्यात सध्या काँग्रेस पक्ष जिल्ह्यात आहे की नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे यासाठी काँग्रेसला जिल्ह्यात एक सक्षम नेतृत्वाची गरज असल्याचे मत तळागाळातील सामान्य कार्यकर्ते बोलत आहेत या अगोदर जिल्ह्याची धुरा खा . रजनीताई पाटील यांचे पती गांधी घराण्याशी एकनिष्ठ जिल्हाध्यक्ष म्हणून अशोक पाटील यांनी जबाबदारी सांभाळली परंतु त्यांनी केज तालुका सोडता फारसा प्रभाव पाडता आला नाही. त्यानंतर सर्जेराव काळे , राजकिशोर मोदी यांना संधी देण्यात आली त्यानंतर राजेसाहेब देशमुख यांनाही जिल्हाध्यक्ष पदाची काँग्रेसने जबाबदारी दिली परंतु त्यांनाही जिल्ह्याभरात प्रभाव टाकता आला नाही त्यानंतर राहुल सोनवणे जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी घेतली राजकिशोर मोदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटात प्रवेश व राजेसाहेब देशमुख यांनी पद उतार होताच दुसऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार)पक्षात प्रवेश केला .बीड जिल्ह्यातील काँग्रेसचे नेते सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रम घेताना दिसत नाहीत तसेच प्रत्येक तालुक्यातील असणारे काँग्रेसचे पदाधिकारी सुद्धा फारसे सक्रिय दिसत नाहीत प्रत्येक पदाधिकारी हा आपापल्या स्वार्थासाठी पदाचा वापर करताना दिसत असून सामाजिक बांधिलकी मात्र जोपासताना जिल्हाभरात काँग्रेस दिसत नाही हीच मोठी शोकांतिका आहे त्यामुळे काँग्रेसला बळ मिळण्यास अडचण निर्माण होत आहे



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com